## NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २२.०७.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २२.०७.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश—१५, तथा विशेष पोक्सो न्यायाधिश नागपुर, श्रीमती एच. ए. अन्सारी मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष पोक्सो केस क्र. ४४८/२०२४ मधील, पोलीस ठाणे सिताबर्डी येथील अप. क्र. ४१८/२०२४ कलम ३५४ भा.दं.वि., सहकलम ७,८,११,१२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी सुफीयान सिराज शेख, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. १६, ठाकुर प्लॉट, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३५४ भा.दं.वि., मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ४,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ८ पोक्सो अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम १२ पोक्सो अन्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ४,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १८.०५.२०२४ चे १७.३० वा चे सुमारास, १७ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी ही आपले घरी जात असतांना, आरोपीने फिर्यादीचे दुचाकीचा पाठलाग करून, तीला पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत अडवुन, तीचेशी अश्लील वर्तन करून, तीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून, फिर्यादीचा विनयभंग केला. अशा फिर्यादी हिने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २०.०५.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी मपोउपनि. श्रीमती मोसमी कटरे मॅडम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती वाय.एस. राऊत मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. प्रविण पांडे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. किरण कैथल व मिनल लोणारे यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २२.०७.२०२६ चे १६.०० वा. ते १६.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, सनी माखीजा नावाचा हद्दपार ईसम दाभा परीसरातील व्हाईट हाऊस जवळ फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, दाभा परीसरात पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम हा व्हाईट हाऊस, दाभा बस स्टॉप जवळ दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सनी जयरामदास मखीजा, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट

नं. ३६, देवी मंदीर मागे, टेका नाका, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२६ दिनांक ०७.०१.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. सारंग मिराशी, पोहवा. रोशन तिवारी व त्यांचे पथकाने केली.

**<u>२) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या ईसमास अटक.</u>**

दिनांक २२.०७.२०२६ चे १४.५० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, पिपळा रोड, ढगे चे बंगल्याचे बाजुला असलेल्या मोकळ्या मैदानात एक ईसम संशयास्पदरित्या हातात थैली घेवुन जाताना दिसल्याने, त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून व घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव यशवंत पुरूषोत्तम हजारे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ६२, विठ्ठल नगर, हुडकेश्वर, नागपुर असे सांगीतले. त्याचेजवळील पांढऱ्या रंगाचे थैलीची पाहणी केली असता, त्यामध्ये एक लोखंडी धारदार तलवार किंमती ५००/—रू. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली. आरोपी हा घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी वपोनि श्रीमती अनामिका मिर्झापुरे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. पपीन रामटेके, पोहवा. गोपाल देशमुख, विजय सिन्हा, दिनेश गाडेकर, संदीप पाटील व पोअं. प्रज्वल यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे लकडगंज :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी निखील नरेश भोंगाडे, वय ४३ वर्ष रा. सतनामी नगर, नागपूर हे बॅक ऑफ बडोदा शाखा वर्धमान नगर येथे शाखा व्यवस्थापक आहेत. आरोपी राजु विठ्ठलराव दरवेकर, वय ३८ वर्षे, २) सौ. प्रिती राजु दरवेकर, वय ३८ वर्षे, दोन्हीही रा. प्लॉट नं. १०, शाम नगर, मनिष नगर, नागपुर यांनी संगणमत करून दिनांक ३०.०३.२०१५ रोजी त्यांची मौजा बाबुलखेडा शिट क्र. २८८/५९, खसरा क्र. ६५/२ ही प्रॉपर्टी बॅकेमध्ये गहाण ठेवुन १५ लाख रूपये कर्ज उचलले होते. आरोपींनी कर्जाची परतफेड न केल्याने, फिर्यादी यांनी वसुली प्रक्रीया सुरू केली असता, आरोपी यांनी नमुद प्रॉपर्टीचे बनावट कागदपत्रे तयार करून, १) विदर्भ कोकण ग्रामीण बॅक, शाखा पारडी २) अरविंद सहकारी बॅक लिमीटेड, डिगडोह ३) युसिडी बॅक, सोमलवाडा येथे गहाण ठेवुन कर्जाची उचल केल्याचे फिर्यादी यांना समजले. आरोपींनी फिर्यादीचे बॅकेत प्रॉपर्टी गहाण ठेवुन कर्जाची उचल करून परतफेड न करता, त्या प्रॉपर्टीचे बनावट कागदपत्रे तयार करून ईतर बॅकेत सादर करून तेथुनही कर्ज उचलुन फिर्यादीचे बॅकेची १५,००,०००/—रू. ची फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सुरज कोल्हे ९०११३५८३९३ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** सौ. आरती अक्षय गणवीर, वय २६ वर्षे, रा. कस्तुरबा नगर, गल्ली नं. ०५, विश्वरत्न बुध्द विहार जवळ, वानखेडे यांचे घरी किरायाने, जरीपटका, नागपुर ह्या दिनांक १९.०७.२०२६ चे १७.३० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कुणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे भुरे कलर केलेले व लांब, अंगात— पांढऱ्या रंगाची सलवार कुर्ती हिरवे फुलाची डिझाईन असलेला व काळ्या रंगाची लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हाताचे मनगटावर मोरपंखाचा टॅटु आहे.



सौ. आरती

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

वाहतूक परिमंडळ अजनी नागपूर शहर हद्दीत सहायक अभियंता श्रेणी—१, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग क्र. ५४, नागपूर यांचे तर्फे सीएस कंस्ट्रक्शन ईंडीया प्रा. लि. नागपूर कंपनी कडुन नागपूर शहर अंतर्गत वळण मार्गावरील मानेवाडा चौक येथील कि.मी. १४/०० व म्हाळगी नगर चौक १५/८०० यांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम करणे तसेच, उड्डाणपुलावरील गर्डर टाकण्याचे काम रात्री ११.०० वा. ते सकाळी ०६. ०० वा. पर्यंत करण्यात येणार आहे. सदरच्या भागात दिवस/रात्र व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये करीता, वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**ओंकार नगर चौक कडून मानेवाडा चौक मार्गे जाणारी वाहतूक व म्हाळगी नगर चौकातून मानेवाडा चौक मार्गे जाणारी वाहतूक ही खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

➢ नरेंद्र नगर कडून मानेवाडा चौकाकडे जाणारी जड वाहतूक तसेच, चामट चक्की चौकाकडुन म्हाळगीनगर ते मानेवाडा चौकाकडे जाणारी जड वाहतूक अशी दोन्ही बाजूची जड वाहतूक ही रात्री दरम्यान मानेवाडा चौकातुन नरेंद्रनगर कडे जाणाऱ्या एकेरी मार्गाने आळी—पाळीने सोडण्यात येईल.

➢ रात्रीच्या वेळी वाहतूक वाढल्यास आवश्यकतेनुसार वर्धा रोडने येणारी वाहतूक कोकाकोला चौकातूक सरळ पुढे, तसेच, नरेंद्रनगर चौकातुन वळवून छत्रपती चौकाकडे तसेच, म्हाळगीनगर चौकाडुन मानेवाडा चौकाकडे जाणारी वाहतूक म्हाळगीनगर चौकातून डावे वळण घेऊन हुडकेश्वर रिंग रोड कडे काहीवेळा करीता वळविण्यात येईल.

**सदर अधिसुचना दिनांक २३.०७.२०२६ रोजी पासून ते दिनांक ०७.०८.२०२६ रोजी पर्यत रात्री ११.०० वा. ते सकाळी ०५.०० वा. पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे**)

पोलीस उप आयुक्त, वाहतुक,

नागपूर शहर.